


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ९१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१४ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मला निवडून द्यायला 'पवार साहेबच कारणीभूत' : अजित पवार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, बारामती :** महाराष्ट्राच्या राजकारणात पवार काका पुतणे म्हणजे अजित पवार व शरद पवार यांची नेहमीच चर्चा होत असते. दोन्ही पवार आता वेगळे झाले असले तरी त्यांचं नातं विविध वेळा माध्यमांमध्ये चर्चिलं जातं. असाच काहीसा प्रकार यावेळीही घडला आहे. बारामती नगरपरिषद व माळेगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीच्या निमित्ताने अजित पवारांनी बारामतीत आज मेळावा घेतला. या मेळाव्यात अचानक एका कार्यकर्त्याने आपल्याच पक्षातील काही पदाधिकारी विरोधात काम करतात, अशा स्वरूपाची चिठ्ठी दिली अजित पवारांना दिली.

ती चिठ्ठी पाहताच अजित पवारांनी आपल्या भाषणाचा सगळा टोनच बदलला. अजित पवारांनी अचानकच शरद पवारांविषयी अनेक प्रेमाचे शब्द काढले, त्यांना काकांबद्दल प्रेमाचा पान्हा फुटल्यासारखे यावेळी पाहायला मिळाले.

आता लोकसभेला असं झालं, तसं झालं, हे सांगत बसू नका. एका बाजूला पवार साहेब, एका बाजूला मी होतो. परंतु मी जी काही वेगळी राजकीय भूमिका घेतली. ते झाले गेले गंगेला




मिळाले. पण आता जरा दिलदारपणा वाढवा. मला निवडून द्यायला पवार साहेबच कारणीभूत आहेत ना? मी काय वरून पडलो का? हे कसे विसरता येईल, असे अजित पवार यावेळी म्हणाले आहेत.

बारामतीत एका बाजूला मी आणि दुसऱ्या बाजूला साहेब होते. साहेबांना लोक कसे सोडतील? साहेबांवरही बारामतीचे प्रेम आहेच ना. मला खासदारकीला ४८ हजार मते कमी पडली. मी मान्य केले की नाही? पण मग विधानसभेच्या वेळेस हे सगळे प्रेम पुन्हा सुरू झाले की नाही. भरघोस मतांची मला बारामती तालुक्यात पिछाडी होती. मग विधानसभेला १ लाख मते कुठून आली? झालं गेलं गंगेला मिळालं. काही गोष्टी सोडायच्या असतात. कऱ्हा नदीला मिळालं, सोनगाव वरून चंद्रभागेला मिळालं, असं अजित पवार म्हणाले अन् भर सभेत एकच हशा पिकला.

पावसाळ्यात छत्र्या उगवतात तसं काहीजण निवडणुकीत उगवतात. निवडणूक झाल्यावरती बाहेर दिसतात का? कधी तुमच्या सुख दुखात आलेत का? याचा विचार करा. माझ्यावर टाकलेला विश्वास कधीही खोटा ठरवू शकणार नाही, असंही अजित पवार यावेळी म्हणाले.

## काँग्रेस नेत्याचा धावत्या रेल्वेतून पडून मृत्यू



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील काँग्रेस तालुका कमिटीचे माजी तालुकाध्यक्ष बाजार समितीचे माजी सभापती तसेच पैठण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रभारी डॉ. सत्येंद्र भुसारी रेल्वेतून पडून मृत्यू झाला आहे. बुधवारी १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास कसारा रेल्वे स्टेशनवर धावत्या रेल्वेतून पडून त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. ही बातमी वाऱ्यासारखी पसरल्यानंतर चिखली तालुक्यात संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे.

अत्यंत मनमिळावू व सर्व समाजाला सोबत घेऊन डॉक्टर सत्येंद्र भुसारी सदैव समाजकार्यात अग्रेसर राहत असल्याची त्यांची ओळख. मराठा सेवा संघाच्या माध्यमातून सामाजिक कार्याची सुरुवात करून समाजसेवाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कुंतुमय योगदान दिल्यानंतर डॉक्टर भुसारी यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. नुकतीच त्यांची काँग्रेस पक्षाने पैठण विधानसभा मतदारसंघात निरीक्षक म्हणून निवड केली होती. नेमकं याच धावपळीत मुंबई येथील बैठकीसाठी ते प्रवास करत असताना हा अपघात घडला.

प्राप्त माहितीनुसार, मुंबईवरून चिखलीकडे परत येत असताना कसारा घाटात धावत्या रेल्वेतून पडून त्यांचा मृत्यू झाला आहे. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना तात्काळ नाशिकमधील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. ज्या रेल्वेगाडीतून ते पडले ती गाडी कसारा रेल्वे स्टेशनवर थांबत नव्हती. नेमका अपघात कसा झाला. याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

**■ चिखली तालुका झाला स्तब्ध आणि शोकाकुल !**

या घटनेची माहिती मिळतात माजी आमदार काँग्रेसचे राहुल बोंद्रे हे मुंबईहून घटनास्थळी रवाना झाले. नगरचे सरपंच मनोज लाहुडकर देखील मुंबईत असताना तात्काळ त्या ठिकाणी पोहोचले. चिखलीचे आमदार श्वेता महाले यांचे पती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खाजगी स्वीय सहाय्यक विद्याधर महाले यांनीही स्थानिक प्रशासनाची संपर्क साधून आवश्यक मदत करण्याच्या सूचना दिल्या. डॉक्टर भुसारी यांच्या निधनाने चिखली तालुक्याचा संपूर्ण जिल्ह्यात राजकीय सामाजिक आणि शिक्षण क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## राज्यासह मुंबईत थंडीचा जोर वाढला

**दि.१३, ठाणे :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील सर्वच जिल्ह्यांत पारा घसरत असून राज्यभर थंडीची हुडहुडी भरणारा गारठा अनुभवायला मिळत आहे.

मुंबईकर देखील पहाटेच्या वेळी पडणाऱ्या बोचऱ्या गुलाबी थंडीचा आनंद घेताना दिसत आहेत.रोजच्या घामाच्या धारांपासून सुटकारा मिळाल्याने चाकरमानी सुखावल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. दरम्यान राज्यात थंडीचा कडाका आणखी तीन ते चार दिवस कायम राहणार असून पहाटे गारवा आणि दिवसा वाढलेले तापमान अशी स्थिती पाहायला मिळत आहे. मुंबईत तर बुधवारी या मोसमातील सर्वात कमी तापमान १८.६ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. जळगावमध्ये किमान तापमान ९.१ अंश सेल्सिअस होते, जे सरासरीपेक्षा ६.२ अंशांनी कमी होते. कमाल आणि किमान तापमानातील मोठी तफावत नागरिकांना जाणवत आहे. मागील काही दिवसांपासून राज्यात थंडीची लाट पसरली आहे. अनेक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. जळगावमध्ये बुधवारी किमान तापमान ९.१ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. हे तापमान सरासरीपेक्षा तब्बल ६.२ अंशांनी कमी होते. याच शहरात कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस होते. त्यामुळे दिवसा आणि रात्रीच्या तापमानात सुमारे २१ अंशांचा फरक दिसून आला. मुंबईतही थंडीचा कडाका जाणवला. बुधवारी तर मुंबईत या मोसमातील सर्वात कमी तापमान १८.६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. नाशिकमध्ये किमान तापमान १०.६ अंश सेल्सिअस होते. पुणे, लोहगाव, अहिल्यानगर, मालेगाव, नाशिक आणि सांगली यांसारख्या शहरांमध्येही कमाल आणि किमान तापमानात १५ ते १६ अंशांहून अधिक फरक होता. बीडमध्ये किमान तापमान ११.५ अंश सेल्सिअस होते, जे सरासरीपेक्षा ५.३ अंशांनी कमी आहे. छत्रपती संभाजीनगर आणि परभणी येथे किमान तापमान अनुक्रमे १३ आणि १३.४ अंश सेल्सिअस होते. या दोन्ही ठिकाणी कमाल तापमान ३१.२ अंश सेल्सिअस होते. विदर्भातही थंडीचा प्रभाव दिसून आला. यवतमाळमध्ये किमान तापमान १०.६ अंश सेल्सिअस होते, जे सरासरीपेक्षा सात अंशांनी खाली उतरले होते. गोंदियातही किमान तापमान १०.५ अंश सेल्सिअस होते. यवतमाळमध्ये कमाल तापमान ३०.४ अंश सेल्सिअस होते, तर गोंदियात ते २८.८ अंश सेल्सिअस होते. ही थंडीची लाट पुढील तीन ते चार दिवस अशीच कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे

## कार पूर्णपणे जळून खाक, आत ४-५ जण, पुण्यात भीषण अपघात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, पुणे :** बंगळुरु महामार्गावरील नवले पूल भागात पुन्हा एकदा भीषण अपघात झाला आहे. गुरुवारी संध्याकाळी दोन कंटेनर आणि एका कारचा अपघात होऊन आग लागली. दोन्ही कंटेनर पेटले आणि कार त्यांच्या मधोमध अडकली. या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. दोन कंटेनरमध्ये कार सापडल्यानं तिचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, तिन्ही वाहनं एकाच दिशेने भरधाव वेगाने जात होती. त्यावेळी एका कंटेनरनं अचानक ब्रेक लावला. त्यावेळी कंटेनरच्या मागे एक कार होती. कंटेनरनं अचानक ब्रेक मारताच मागे असलेली कार कंटेनरला जाऊन धडकली. त्यानंतर कारच्या मागे असलेल्या कंटेनरनं कारला मागून जोरदार धडक दिली. या धडकेनंतर काही क्षणातच दोन्ही कंटेनरना आग लागली.

अपघातानंतर मोठा आवाज झाला. त्यानंतर आसपासच्या लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. एका प्रत्यक्षदर्शीनं दिलेल्या माहितीनुसार, स्फोटाचा आवाज ऐकून आम्ही अपघातस्थळी धावलो. आम्ही पोहोचलो तेव्हा कारला आग लागलेली होती. ट्रकमध्ये अडकलेला एक जण मदतीसाठी आरडाओरडा करत होता. बहुधा तो क्लिनर होता. बाहेर काढा, बाहेर काढा असं तो मोठमोठ्यानं ओरडत होता. पण आगीची तीव्रता पाहता स्फोट होण्याची भीती होती. कधीही स्फोट होईल असं वाटत होतं.



त्यामुळे मदतीसाठी कोणीच पुढे गेलं नाही. दुसऱ्या प्रत्यक्षदर्शीनं दिलेल्या माहितीनुसार, गाडीचा ब्रेक फेल झाला होता. त्यानं पुढील कंटेनरला धडक दिली. दोन कंटेनरच्या मध्ये एक फॅमिली कार होती. त्यात चार ते पाच जण होते. ती कार पूर्णपणे जळून खाक झाली. ट्रकला आग लागली. कंटेनरचा चालक आणि बाकीचे आतच राहिले. त्यांना बाहेर पडता आलं नाही. ते सगळे आतच जळून खाक झाले.

भीषण अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. अग्निशमन दलाचे जवान आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलानं शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळवलं. मात्र तोपर्यंत मोठं नुकसान झालं होतं.

## संत नगरी शेगावमध्ये महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे महायोगोत्सव संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, शेगाव (बुलढाणा) :** संतांची नगरी म्हणून सर्वदूर ओळख असलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव मध्ये मंगळवार दिनांक ११ व १२ नोव्हेंबर २०२५ रोजी, महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र योगशिक्षक संघचे महायोगोत्सव २०२५ हे संपन्न झाले. राज्यातील सर्व योगशिक्षक एकाच छताखाली येऊन विचारांची देवाणघेवाण करतील व महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील सदस्यांची ओळख होईल ह्याच मुख्य हेतूने महायोगोत्सव प्रतिवर्षी साजरा करण्यात येतो.



**मुंबई जिल्ह्यासह एकूण १२०० योगशिक्षकांची लक्षणीय उपस्थिती**

महायोगोत्सव २०२५ चे उद्घाटन योग विद्या गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वासराव मंडलिक गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आले. दोन दिवसीय महायोगोत्सवात योग संबंधी अनेक व्याख्याने व योग आसनांचे प्रात्यक्षिके सादर करण्यात आले. या महायोगोत्सवात मुंबई जिल्ह्यासह एकूण १२०० योगशिक्षक उपस्थित होते. यावेळी मुंबई जिल्हा उपाध्यक्षा मनुजा चव्हाण, महासचिव कृष्णकुमार शिंदे, सचिव हिरा गणवीर, कोषाध्यक्षा रिद्धी देवघरकर, मीडिया प्रभारी अमित चिबडे, मुंबई जिल्हा सदस्य भारती कवनकर, सुनीता कांबळे, दिलीप घाडगे, प्रभा शेट्टी, कांचन राणे, वर्षा शर्मा, जयदीप कनकिया, राखी सोनवणे, सोनल पिंगळे, सोनाली चव्हाण, वैशाली कराड, मनीषा गोहिल, भानुदास मकदूम, लक्ष्मीबेन गजरा, कविता पतंगे, बाबुराव घाडगे, संगीता घाडगे, स्वाती सावंत, अनिल सावंत आणि महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे मुंबई जिल्हा अध्यक्ष व राज्य कोषाध्यक्ष संतोष खरटमोल उपस्थित होते.

## वकिलाने केली बेडरुममध्ये गळफास घेऊन आत्महत्या !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, सोलापूर :** एसआरपीएफ कॅम्पशेजारी असलेल्या समर्थ सोसायटीमध्ये वकिलाने पहिल्या राहणाऱ्या मजल्यावरील बेडरूममध्ये स्लॅबच्या छताला रस्सीच्या साहाय्याने गळफास घेतला. शासकीय रुग्णालयात डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. बुधवारी (१२ नोव्हेंबर) सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास ही घटना घडली. सागर श्रीकांत मंद्रूपकर (वय ३२, १५९, समर्थ सोसायटी, सोलापूर) असे त्यांचे नाव आहे. यातील मयत सागर यांनी विधिची पदवी प्राप्त केली असून, ते न्यायालयात प्रॅक्टिस करीत होते. बुधवारी दुपारच्या वेळी त्यांनी राहत्या घरी दुसऱ्या मजल्यावरील बेडरुममध्ये गळफास

**■ महिन्यापूर्वी पोलिसांनी मारहाण केल्याची केली होती तक्रार**

यातील मयत वकील सागर मंद्रुपकर यांनी महिन्यापूर्वी पोलिसांनी मारहाण केल्याची तक्रार विजापूर नाका पोलिस ठाण्यात दिलेली होती. महिन्यापूर्वी ते कामानिमित्त बारामतीला गेले होते, पहाटे सोलापुरात परतल्यानंतर त्यांनी मित्राला मोपेड घेऊन बोलावले होते. मात्र, ती वाटेतच बंद पडल्याने ती एसआरपीएफ कॅम्प रोडवर उभी करून दुसऱ्या दुचाकीने सागर यांस आणले. परत येताना रोडवर लावलेली दुचाकी दिसली नाही. दुसऱ्या दिवशी मोपेड विजापूर नाका पोलिस ठाण्यात असल्याचे समजले. तेथे दुसऱ्या दिवशी ठाण्यात गेल्यानंतर मोपेडची डिक्की पोलिसांकडून उघडली गेल्याचे दिसून आले. त्यात दोन मोबाइल व अन्य साहित्य मिळाले. यावेळी वकील सागर हा मित्राशी बोलत असताना पोलिसांना बोलल्याच्या गैरसमजुतीने सिव्हिल ड्रेसमधील पोलिसांनी सागरला मारहाण केल्याची माहिती त्यावेळी दिली होती. यासंदर्भात बार असोसिएशनपर्यंत हे प्रकरण गेले होते. मागच्या घटनेचा आणि आत्महत्येचा काही संबंध आहे का? अशी चर्चा समर्थ सोसायटी परिसरात सुरू होती.

घेतल्याची माहिती विजापूर नाका पोलिस ठाण्याला मिळाली. तातडीने वरिष्ठ पोलिस निरीक्षक दादासाहेब गायकवाड यांनी हवालदार व्ही. डी. घुगे यांना घटनास्थळी पाठवले जागेवर पंचनामा करून सागर यांना बेशुद्धावस्थेत शासकीय रुग्णालयात आणले. तेथे डॉक्टरांनी तपासणी केली आणि त्यांचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे घोषित केले. सिव्हिल चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

**आईकडून दुजाभावाची वागणूक; चिठ्ठी सापडली...**

सागर आणि त्याची आई यांच्यामध्ये मंगळवारी रात्री भांडण झाले होते. त्याचे वडील शासकीय नोकरदार असून, विवाहित बहीण आहे. त्याने गळफास घेतल्यानंतर शोध घेताना पोलिसांना चिठ्ठी आढळून आली. त्यामध्ये त्यातील आशय असा आहे की, 'आईकडून सतत होणारा दुजाभाव यामुळे मी आत्महत्या करीत आहे. माझ्या आत्महत्येला ती जबाबदार आहे. माझ्या मृत्यूनंतर तिला कडक शिक्षा करा. ही नम्र विनंती' पोलिसांनी चिठ्ठी ताब्यात घेतली आहे.

## संपादकीय



## गुरू वस्ताद

आज १४ नोव्हेंबर, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांची जयंती. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे

इतिहास म्हणजे भूतकाळा मध्ये घडून गेलेल्या घटनांची नोंद असते त्याचा वर्तमानकाळात उपयोग होतो का? यासाठी आपण इतिहासाची पाने चाळत असतो. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात अनेक व्यक्तींचे योगदान मोलाचे ठरले.काहींच्या नावाची पारायण झाले तर काही कायम अनामिक राहिले. त्यापैकी आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे हे एक होय. आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या 'पेठ'या गावी झाला.

लहुजी साळवे यांचे पूर्वज छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारात सेवेने, निष्ठेने चाकरी करत होते. त्यांच्या कामावर छत्रपती शिवाजी महाराज खूश झाले ; आणि त्यांनी साळवे घराण्याला 'राऊत' ही पदवी बहाल केली. साळवे कुटुंबाचे मूळपुरुष ' लहुजी ' हे होते. आजोबाचे नाव नातवाला देण्याच्या परंपरेतून लहुजींचे वडील राघोजी आणि आई विठाबाई (गयाबाई ) यांनी आपल्या पुत्राचे नाव लहुजी ठेवले.

लहुजींचे वडील राघोजी साळवे यांचे शौर्य, कर्तबगारी व वन्यपशूंविषयीचे ज्ञान पाहून दुसरा बाजीराव पेशवे याने त्यांच्याकडे १८०६ मध्ये पुण्यातील शिकारखाण्याची जबाबदारी सोपवली होती. पुढे त्यांच्याकडे शस्त्रागाराचीही जबाबदारी संपवण्यात आली.या घटनेनंतर साळवे कुटुंब पुण्यात दाखल झाले. गंज पेठेत हे कुटुंब वास्तव करू लागले. १८१७ मध्ये इंग्रज-मराठा युद्ध खडकी येथे झाले. त्यावेळी पेशव्यांचा सरसेनापती बापू गोखले हे होते. या युद्धात राघोजी साळवे धारातीर्थी पडले. 'जोपर्यंत या देशातून इंग्रजांची सत्ता नेस्तेनाबूत करणार नाही, तोपर्यंत स्वस्त बसणार नाही. अशी प्रतिज्ञा त्यावेळी लहुजींनी घेतली. राघोजी साळवे यांची समाधी मुंबई- पुणे महामार्गावर वाकडेवाडी जवळ असून ती 'मांगीर बाबाची समाधी म्हणून ओळखली जाते. आजही मातंग समाजातील राघोजी साळवे वर श्रद्धा असणारे लोक अभिवादन करण्यासाठी दरवर्षी मांगीर बाबा च्या समाधीपाशी जमतात.

लहुजीनी यापुढे जगेन तर देशासाठी मरेन तर देशासाठी हा निर्धार केला. बलवान व्हा आणि स्वराज्य मिळवा ही त्यांची वाक्य त्या काळातील अनेक तरुणांना त्यांच्या आखाड्याकडे आकर्षित करत होती. ऑक्टोबर १८२२ मध्ये पुणे येथील पुनवडीच्या परिसरात मल्लविद्याची तालीम त्यांनी स्थापन केली. या तालमीमध्ये घोडेस्वारी करणे, बंदूक, गुद्‌गुदा, गोफण, दांडपट्टा ही शस्त्रे चालवण्यास शिकवली जात होती. शिक्षणाबरोबरच नदीवर पोहणे, पोटाने भिंत चढणे इत्यादीचा समावेश होता. या कार्यास त्यांना रानबा गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते. लहुजी साळवे यांनी तालमीतील तरुणांना मल्लविद्याचे शिक्षण दिले. त्याचप्रमाणे जातीयता, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी सामाजिक समतेचेही धडे दिले. त्यामुळे त्यांच्या तालमीत शिक्षण घेतलेल्या अनेक तरुणांनी क्रांतिकारी कार्याबरोबरच समाजसेवेचेही कार्य केले. त्यात रानबा गायकवाड, भागोजी नाईक, राघोजी नाईक, जोतीराव फुले, सदाशिव गोवंडे, सखाराम परांजपे, मोरो विठ्ठल वाळवेकर, उस्मान शेख, तात्या टोपे, रंगो बापू, बाबिया, योरीया, दौलतराव नाईक, धर्मा, गणू शिवाजी साळवे, धुराजी, आपाजी, वासुदेव बळवंत फडके, बाळ गंगाधर टिळक व अण्णासाहेब पटवर्धन इत्यादी लहुजी साळवे यांचे अनेक शिष्य दिसतात. लहुजी साळवे यांनी १८२२ ते १८४८ या काळात अत्यंत गुप्त पद्धतीने तरुणांना लष्करी शिक्षण देऊन भारतीय स्वतंत्र आंदोलनात क्रांतिकारकांची फौज तयार केली. १८५७ च्या उठावात लहुजी साळवे यांच्या शिष्यांनी नानासाहेब पेशवे, तात्या टोपे व रंगो बापूजी यांच्या सैन्यात सामील होऊन सातारा, मिरज, कानपूर, झाशी या ठिकाणी उठाव केले. साताऱ्याच्या झेंडा मैदानावर दि. ७ डिसेंबर १८५७ रोजी फाशीवर चढवण्यात आलेले बाबीया, योरिया, नाथ्या, यल्या, मलय्या या मातंग क्रांतिकारकानी लहुजी साळवे यांच्याकडून लष्करी शिक्षण घेतले होते. १८५७ च्या सुमारास पुण्यातील ब्रिटिश अधिकाऱ्यांना लहुजी साळवे यांच्या क्रांतिकारी कार्याबद्दल संशय आला होता. त्यामुळे त्यांनी लहुजी



साळवे यांच्या तालमीवर धाड घातली होती. परंतु अगोदरच याची पूर्वकल्पना मिळाल्यामुळे सर्व शस्त्रास्त्रे तालमीतील तरुणांनी जमिनीत पुरून ठेवली होती. त्यामुळे ब्रिटिशांना लहुजींच्या तालमीत कोणताही पुरावा मिळू शकला नाही.

१८४८ ते १८८१ हा लहुजी वस्ताद साळवे यांच्या जीवनातील दुसरा अध्याय होता.जो त्यांनी सामाजिक विषमता, अनिष्ट प्रथा, पुरोहितशाही, अन्याय-अत्याचारी जातीय व्यवस्था, समाजातील वाईट परंपरा, बालविवाह पद्धती नष्ट करणे, विधवा विवाह बंदी उठवणे, अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देणे, त्याचप्रमाणे अस्पृश्यांना शिक्षण, स्त्री शिक्षण व शिक्षणाचा प्रसार या कामात खर्ची घातला. गुरुजी लहुजीबुवा यांच्या तालमीत दयाळू इंग्रज सरकारला पालथे घालण्यासाठी, दांडपट्ट्याची व निशान मारण्याची कसरत करण्यासाठी प्रवेश केल्याबद्दल 'गुलामगिरी' ग्रंथात महात्मा ज्योतिराव फुले यांनी विचार व्यक्त केले आहेत. समाजकंटकांकडून जोतीरावांना ठार मारण्यासाठी गुंड पाठवण्यात आले; परंतु हा हल्ला लहुजी साळवे यांच्या निष्ठावंत शिष्यांनी उधळून लावला. नंतरच्या काळात जोतिराव व सावित्रीबाईंच्या जीवाला धोका होऊ नये म्हणून लहुजी साळवे यांनी आपल्या तालमीतील शिष्यांचे जागते पहारे ठेवले होते. २४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली स्थापनेच्या प्रसंगी ६० व्यक्तींनी सर्वप्रथम तळ भंडारे उचलून सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व स्वीकारले होते. त्यात लहुजी साळवे व त्यांच्या तालमीतील अनेक शिष्यांचा समावेश होता.

महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शाळेत आपली पुतणी सत्यशोधक मुक्ता साळवे हिला लहुजींनी प्रवेशित केले. मुक्ता साळवे हिने चौथीच्या वर्गात शिक्षण घेत असताना जो निबंध लिहिला तो 'ज्ञानोदय' या वर्तमानपत्रांमध्ये १५ फेब्रुवारी व १ मार्च १८५५ या दोन अंकात प्रसिद्ध झाला होता. या निबंधात मुक्ताने प्रस्थापित धर्म व्यवस्थेतील अनाचार, विषमता, दांभिकपणा उघड केला. आमच्या अस्पृश्यांचा धर्म कोणता? असा प्रश्न निबंधात उपस्थित केला.

मुक्ता साळवे हिने लिहलेला निबंध म्हणजे लहुजी साळवे यांच्या संस्काराचे लिखित रूप आहे असे म्हणावे लागेल.लहुजी साळवे यांनी १८७६ते १८७८ या काळातील भीषण दुष्काळात पुण्यातील गंजपेठ या ठिकाणी अन्नछत्र सुरू करून आपल्या अस्पृश्य बांधवांची सेवा केली होती. हे अन्नछत्र सुरू करण्यासाठी त्यांना पुण्यातील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींनी मदत केली होती. वयाच्या ८७ व्या वर्षी दि. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी सत्यशोधक लहुजी वस्ताद साळवे यांचा मृत्यू झाला. संगमवाडी, पुणे येथे त्यांची समाधी आहे.

शिक्षणाची कास धरली पाहिजे, जातिवाद, धर्मभोळेपणा याला मुठमाती देऊन देश कार्याला वाहून घेतले पाहिजे, हा निर्धार आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांना आज जयंतीदिनी अभिवादन करताना करूया.



**- किशोर जाधव**
**सोलापूर**
**मो.९९२२८८२५४१**

## संगीत खुर्ची...

चपला आहेत कमी
पुष्कळ तिष्ठत पाय
जिकडे जमले जोड
तिकडे सरळ जाय

बुकींगआधीचं फुल
प्रश्न करायचे काय
लोणी रात्री पळवले
भाकर कोरडी खाय

स्वकीयांने नाकारले
पुन्हातसाचं अन्याय
न्याय यात्रेत चाललो
हरवून बसलो न्याय

दुसरा घरोबा चांगला
ठेवला नाही रे पर्याय
तिकीटदेता का कुणी
करे भ्रमंती ठाय ठायं

संधीसाधूंना दे संधी
करुद्या किती अपाय
तुल्यबळचं उमेदवार
नको पक्षाला अपाय

पत्रकारचॅनेल गोंधळे
खाताना बिस्कुटचाय
कॅमेरे घेऊन धावतात
हॅलो बोलो हाय हाय


उमेदवारांची फरफट
आता रे पाहवत नाय
संगीत खुर्ची खेळाची
लज्जत करा एन्जॉय

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक बातमी अचूक बातमी

# बालदिन !!

आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते



सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## गुगल पे वरील ऑनलाईन व्यवहाराचा विश्वास दुणावला !!

माझे अनेक वर्षापासून आर्थिक व्यवहार आहेत. त्या माझ्या राष्ट्रीयकृत बँकेतून २ ऑक्टोंबर २०२५ रोजी एका व्यक्तीला गुगल पे वरुन रुपये ६२५०/- पाठवले होते. पण त्या व्यक्तीला ती रक्कम मिळाली नव्हती. कारण ज्या व्यक्तीला रक्कम पाठवली त्या बँकेचा आयएफसी कोड बदलेला होता, वास्तविक पाहता ते ट्रांजेक्शन फेल व्हायला पाहिजे होते. पण ते न होता डेबिट झाले होते. त्यामूळे ज्या राष्ट्रीयकृत बँकेतून रक्कम पाठवली तेथे छानबिन, चौकशी केली असता ती रक्कम खर्च पडल्याचे समोर आले. ऑनलाईन व्यवहाराच्या दृष्टीने किमान तीन ते सात दिवसात ती रक्कम रिफंड व्हायला पाहिजे होती पण तसे झाले नाही. त्यामूळे मनाची हुरहूर लागून राहिली होती. दिवस लांबत चाल्याने मनात अनेक शंका उपस्थित होवू लागल्या होत्या. रक्कम मिळणार नाही, बुडणारं ऑनलाईन व्यवहार करायचे की नाही असे एक ना अनेक सवाल उपस्थित होत होते. विश्वास उडत चालला होता हे सर्व होत असताना एनपीसी अर्थात नॅशनल पेमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया यांचा मेल प्राप्त झाला होता. त्यामूळे मला थोडा धीर आला होता. रक्कम कुठेही जाणारं नाही असे वाटतं होते. त्या मेलमध्ये गूगल पे ने म्हंटले होते, प्रिय ग्राहक आपली रक्कम त्या व्यक्तीला मिळाल्याचे म्हंटले होते. पण प्रत्यक्ष तसे झाले नव्हते. कोणीही खोटे बोलत नव्हते. पण काय झाले होते कोणालाच काही कळत नव्हते. मी रोज बँकेशी चौकशी करत होतो. पण हाताला काहीच लागत नव्हते रक्कम छोटी असली तरी ती आमच्यासाठी मोठी होती. शेवटी तब्बल ४० दिवसांनी म्हणजे ११ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजून २ मिनिटांनी गुगलपे ने रक्कम जमा केली. त्यामूळे आनंदाला पारावार उरला नाही. त्यामूळे पुन्हा एकदा गुगल पे वरील विश्वास अधिक वृद्धिंगत झाला असून तो दुणावला आहे. त्यामुळे गुगल पे चे तसेच याकामी सहकार्य केलेल्यांचे मनस्वी आभार, धन्यवाद...!

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पंढरपूर अर्बन बँके तर्फे कै.देशभक्त बाबुरावजी जोशी व्याख्यानमालेचे आयोजन




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि., पंढरपूर तर्फे प्रतिवर्षीप्रमाणे सहकार सप्ताहाचे औचित्य साधुन कै.देशभक्त बाबुराव जोशी व्याख्यानामालेचे आयोजन दिनांक १४ ते १६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत कर्मयोगी सभागृह, खवा बाजार, नवीपेठ, पंढरपूर येथील शाखेत करण्यात आल्याची माहिती बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी दिली. याप्रसंगी माहिती देताना ते म्हणाले, पंढरपूर अर्बन बँक यावर्षी ११४ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. सभासद, ग्राहक, हितचिंतक यांचे अर्थकारणासह विविध प्रश्नांवर विचार मंथन होवुन समाजप्रबोधन व्हावे, यासाठी व्याख्यानमालेचे आयोजन करणेत आले आहे. सदर व्याख्यानमालेचा शुभारंभ शुक्रवार, दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं.६ वाजता आंतरराष्ट्रीय घडामोडींचे अभ्यासक शैलेंद्र देवळाणकर, पुणे यांचे ट्रम्प, टेरिफ आणि भारत व्दारे होणार आहे. तसेच शनिवार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ डॉ.नंदकुमार मुलमुले, नांदेड यांचे यशाकडून समाधानाकडे व रविवार, दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी एमएबी एविऐशनचे संचालक ज्येष्ठ पत्रकार मंदार भारदे, मुंबई यांचे सुखी होण्याची तारीख ठरली का? याप्रमाणे व्याख्यान आयोजित केले आहे. सदर व्याख्यानमाला कर्मयोगी सभागृह, खवा बाजार, नवीपेठ, पंढरपूर येथे दररोज सायंकाळी ६ वाजता आयोजित केला आहे. या व्याख्यानमालेस रसिक प्रेक्षकांनी उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा असे आवाहन बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.याप्रसंगी बँकेचे व्हाईस चेअरमन माधुरीताई जोशी, संचालक रजनीश कवठेकर, हरिष ताठे, पांडुरंग घंटी, शांताराम कुलकर्णी, विनायक हरिदास, राजाराम परिचारक, अमित मांगले, अनंत कटप, गणेश शिंगण, ऋषिकेश उत्पात, व्यंकटेश कौलवार, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, तज्ज्ञ संचालक अतुल कौलवार, प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे, शुभम लाड, संचालिका संगिता पाटील व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे आदी मान्यवर उपस्थित होते.

## बिबट्याच्या हल्लयात खारेकर्जुने येथिल ५ वर्षाच्या मुलीचा मृत्यू

### आ.दाते तत्काळ घटनास्थळी दाखल; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** नगर तालुक्यातील मौजे खारेकर्जुने येथे बिबट्याच्या हल्लयात पाच वर्षाच्या रियंका सुनील पवार ह्या अल्पवयीन मुलीला उचलून नेल्याची दुर्दैवी घटना दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडल्याचे समजताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरा ११ वाजता स्वतः उपस्थित राहून त्यांनी पीडित कुटुंबीयांना धीर दिला तसेच घटनास्थळाची पाहणी केली. या प्रसंगी एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलारे, कैलास लांडे, जन्माहद सय्यद, सरपंच प्रभाकर मगर, रोहीदास गायकवाड, मारुती बढेकर, तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून परिसरातील नागरिक बिबट्याच्या दहशतीखाली असल्याचे निदर्शनास आल्याने यावेळी आमदार दाते यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना बिबट्या सापडेपर्यंत गाव न सोडण्याच्या सक्त सूचना दिल्या. तसेच, हा बिबट्या आता नरभक्षक स्वरूपाचा झालेला असल्याने त्याला तातडीने पकडण्यात येईल, त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता आपली व आपापल्या कुटुंबातील सदस्यांची काळजी घेण्याविषयी स्थानिक ग्रामस्थांना जागरूक केले.

आमदार दाते यांनी नागरिकांना आवाहन केले की, परिस्थिती कसलीही असुद्या, प्रसंग सुखाचा असो की दुःखाचा एक लोकप्रतिनिधी म्हणुन, आपल्या कुटुंबातील घटक म्हणुन मी कायम आपल्या सोबत आहे, प्रशासन आपले काम करेल, त्यांना परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्वांनी सहकार्य करावे. एकदा गेलेला जीव परत आणता येत नाही. त्यामुळे एक जबाबदार नागरिक म्हणून आपण आपली व आपल्या कुटुंबियांसह इतरांचीही काळजी घेतली पाहिजे. गावातील नागरिकांनी रात्री बाहेर जाताना खबरदारी घ्यावी, लहान मुलांना एकटे सोडू नये, आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित वन विभागास माहिती द्यावी.

# कुंभमेळा विकासासाठी नाशिकला ६ हजार कोटींचा निधी

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सभेला अभूतपूर्व गर्दी




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** आगामी नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळालक्षात घेता नाशिक जिल्ह्याच्या विकासासाठी तब्बल ६ हजार कोटी रुपयांचा निधीराज्य सरकारकडून मंजूर करण्यात आला आहे. या पहिल्या टप्प्यातील विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि नाशिक जिल्हा परिषदेच्या नूतन वास्तूचे लोकार्पणराज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांच्या शुभहस्ते गुरुवारी पार पडले.

या निमित्ताने ठक्कर मैदानावर झालेल्याभव्य सार्वजनिक सभेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मोठी गर्दी उसळली होती. सभेपूर्वी सातपूर भाजप मंडळाच्या वतीने जोरदार तयारी करण्यात आली होती. आयटीआय मैदान ते ठक्कर मैदानया दरम्यानढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणाबाजीच्या जल्लोषातभव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीचे नेतृत्वनाशिक पश्चिम मतदारसंघाच्या आमदार सीमा हिरेयांनी केले. प्रभाग क्रमांक ८, ९, १०, ११ आणि २६ मधील भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

ढोल-ताशांचा गजर, फडणवीस यांच्या स्वागताचा उत्साह आणि कार्यकर्त्यांच्या जल्लोषामुळेसातपूर परिसर दुमदुमून गेला.या रॅलीतून उमटलेल्या उत्साहपूर्ण वातावरणामुळे सातपूर परिसर भाजपच्या रंगात रंगला. यामुळेआगामी नाशिक महापालिका निवडणुकीसाठी पक्षाची संघटना सज्ज असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले.

# श्री.खरवली आई पालखी ग्रुप शिळगांव आयोजित भव्य पालखी आणि पदयात्रा सोहळा

## श्री खरवली आई, श्री.एकविरा आई या दोन आदिशक्तीं बहिणींची भेट

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, शिळगांव (ठाणे) :** श्री खरवलीआई पालखी ग्रुप शिळगांव तर्फे श्री खरवलीआई मंदिर शिळगाव ते श्री क्षेत्र एकविरा आई मंदिर कार्ला भव्य पालखी आणि पदयात्रा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ०९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ७ वाजता श्री खरवलीआई मंदिर शिळगाव पासून भव्य पालखी आणि पदयात्रेला सुरुवात झाली. पालखीचे अध्यक्ष विलास भोईर आणि त्यांच्या पत्नी जयमाला यांच्या हस्ते पालखीची पूजा करण्यात आले.

या पालखीमध्ये २५० ते ३०० पदयात्री सामील झाले होते. बँजो बँड आणि डी.जी.वाजवत, नाचत गाजत, हातात भगवे झेंडे घेऊन आई मी आयलो, आई माऊलीचा उदो उदो, श्री खरवलीआई माते की जय, श्री एकविरा आई माते की जय, अशा घोषणा देत पालखी शिळगावमध्ये आली. ग्रामस्थांनी आलेल्या पालखीचे जोरदार स्वागत केले. आईच्या प्रतिमेला फुल हार, हालद, कुंकू वाहून, पालखीला आरती करून, दोन्ही हात जोडून नमस्कार केले.तसेच सर्व ग्रामस्थांनी पालखीला खांदा दिला. तसेच सखे सोयरे, लग्न झालेल्या सर्व मुली आणि त्यांचे नवरे सुद्धा पालखीला खांदा देण्यासाठी आले होते.

दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७:३० वाजता पालखी श्री.क्षेत्र एकविरा आई मंदिराच्या गडावर पोचली. सर्व पदयात्री गडावर






नाचत होते.आईच्या नावाने घोषणा देत होते. आई मी आयलो, एकविरा आई माते की जय, श्री खरवली आई माते की जय, आईच्या मंदिराजवळ पालखीची आरती करण्यात आली.

सर्व पदयात्रांनी एकविरा आईचे दर्शन घेतले. अशाप्रकारे दोन आदिशक्ती बहिणींची भेट झाली. पुन्हा पालखी घेऊन गडावरून खाली आले.

दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता भंडारा ठेवण्यात आला. महाप्रसादाचा लाभ घेतल्यानंतर दुपारी ३:२० वाजता पालखी पुन्हा घेऊन पदयात्री श्री क्षेत्र खरवलीआई मंदिर कडे निघाली. सायकाळी ६ वाजता पालखी आईच्या मंदिरात पोचली.सर्व पदयात्रेंनी पालखीची आणि श्री खरवलीआईची आरती केली. आणि आईला हात जोडून सर्वांनी नमस्कार.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी ५ ते ९ वाजेपर्यंत श्री खरवलीआई मंदिरावर भंडारा ठेवण्यात आला आहे तरी सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी यावे. असे आवाहन पालखीचे अध्यक्ष विलास भोईर यांनी केले आहे.

श्री खरवलीआई पालखी ग्रुप शिळगांव च्या सर्व सदस्यांनी ही पालखी व्यवस्थित रित्या पार पडण्यासाठी अध्यक्ष विलास भोईर, कार्याध्यक्ष रुपेश आलिमकर, सल्लागार संजय ठाकूर, सचिव अक्षय बागुल, खजिनदार निलेश म्हात्रे, उपखजिनदार अजित भोईर, सदस्य यशवंत भोईर, सागर भोईर, किरण वास्कर, कवीश्वर भोईर, तुषार भोईर,भावेश आलिमकर, लक्ष्मण वास्कर, संदीप पवार, रमेश भोईर, प्रेमनाथ पाटील, तानाजी आलिमकर, शक्ती पाटील, सुनील साळवी, मंगेश म्हात्रे, अजित म्हात्रे, इतर सर्व सदस्यांनी भव्य पालखी पदयात्रा सोहळा पार पडण्यासाठी दिवस रात्र मेहनत घेतली.

# बालाजी अमाईन्स लिमिटेड ला रोटरी इंडियाकडून 'बेस्ट प्रोजेक्ट' पुरस्कार




**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१३, सोलापूर :** देशातील उद्योग समूहांच्या सामाजिक जबाबदारीतील (CSR) उल्लेखनीय कार्याची दखल घेत रोटरी इंडिया नॅशनल उडठ अवॉर्ड २०२५ जाहीर करण्यात आले असून, या प्रतिष्ठित पुरस्कारांमध्ये बालाजी अमाईन्स लिमिटेड, सोलापूर या कंपनीने मोठ्या उद्योगसमूह (Large Enterprise) गटात आरोग्य क्षेत्रातील बेस्ट प्रोजेक्ट हा राष्ट्रीय पुरस्कार पटकावला आहे. हा पुरस्कार समारंभ माणेकशॉ सेंटर, दिल्ली येथे १३ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. या प्रसंगी रोटरी इंटरनॅशनलचे संचालक के.पी.नागेश यांच्या हस्ते बालाजी अमाईन्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक. डी.राम रेड्डी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कार्यक्रमास रोटरी इंटरनॅशनलचे अध्यक्ष शरत जैन, सचिव मंजू फडके तसेच रोटरी इंडिया नॅशनल सीएसआर अवॉर्ड समितीचे अध्यक्ष डॉ. शैलेश पालेकर उपस्थित होते. सोलापूरस्थित बालाजी अमाईन्स लिमिटेड ही अलिफॅटिक अमाईन्स आणि स्पेशालिटी केमिकल्स निर्मिती क्षेत्रातील देशातील अग्रगण्य कंपनी आहे.

व्यावसायिक प्रगतीसोबतच कंपनीने सामाजिक जबाबदारीच्या क्षेत्रात, विशेषतः आरोग्यसेवेच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. कोविड काळापासून कंपनीने आरोग्यसेवा बळकट करण्यासाठी सातत्याने काम केले असून, सोलापूर शहरातील तीन रुग्णालयांचे नूतनीकरण केले आहे. या रुग्णालयांमधून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अत्यल्प शुल्कात किंवा विनामूल्य वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. आधुनिक वैद्यकीय सुविधा, स्वच्छता आणि तंत्रज्ञानाच्या आधारे या रुग्णालयांनी आज कॉर्पोरेट दर्जाची सेवा पुरविण्याची क्षमता निर्माण केली आहे.

या सन्मानाबाबत व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी म्हणाले,कंपन्यांवर उडठ ची जबाबदारी कायदेशीररीत्या लागू होण्यापूर्वीच, आमच्या व्यवस्थापनाने १९९० च्या दशकात 'बालाजी फाउंडेशन'च्या माध्यमातून समाजसेवा सुरू केली होती.

आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, क्रीडा आणि पर्यावरण या क्षेत्रांमध्ये आम्ही सतत कार्यरत आहोत. आमचे चेअरमन. ए. प्रताप रेड्डी नेहमी सांगतात, 'ज्या समाजातून आपण कमवतो, त्यालाच काहीतरी परत द्यावे हीच खरी सामाजिक जबाबदारी.' रोटरी इंडियाकडून राष्ट्रीय स्तरावरील हा सन्मान मिळाल्याचा आम्हाला अभिमान आणि आनंद आहे. हा पुरस्कार बालाजी अमाईन्स लिमिटेडच्या समाजाभिमुख दृष्टीकोनाचा व दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीचा गौरव असून, आरोग्य, शिक्षण आणि समाजकल्याण क्षेत्रांतील त्यांच्या कार्याने इतर उद्योगसमूहांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांची दहशत; वन विभाग लक्ष देणार का? असा प्रश्न

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांची दहशत कमी होत नाहीये. शेतात काम करणं, रात्री बाहेर पडणं तर दूरच, आता दिवसा सुद्धा शेतात काम करणे किंवा घराबाहेर पडताना नागरिकांना भीती वाटत आहे. अनेक गावांमध्ये आणि शहराच्या उपनगरांत बिबट्यांचा वावर वाढल्याने सर्वत्र दहशतीचं वातावरण पसरलं आहे. वनविभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार सन २०२३-२४ ते २०२५ आतापर्यंत या कालावधीत १९ नागरिकांचा मृत्यू, ६७ जखमी, आणि ८ हजारांहून अधिक जनावरांची हानी झाली आहे. या काळात शासनाने तब्बल १,३०६ लाख रुपयांची नुकसान भरपाई वितरित केली आहे.

### २०२३-२४ : प्रारंभीचा इशारा

या वर्षात बिबट्यांच्या हल्लयांमध्ये ४ नागरिकांचा मृत्यू, ५ जखमी, आणि ३,३८१ जनावरांची हानी झाली. नुकसान भरपाई म्हणून शासनाने ४६२.१७ लाख रुपये वितरित केले.

### २०२४-२५ : विक्रमी हल्लयांचे वर्ष

हे वर्ष बिबट्यांच्या हल्लयांसाठी सर्वाधिक भयावह ठरले. ८ नागरिकांचा मृत्यू, ४७ जखमी, आणि तब्बल ४,५१२ जनावरांचा बळी गेला. शासनाने ६९४.०७ लाख रुपयांची नुकसानभरपाई दिली.

### २०२५ (चालू वर्ष) : बिबट्यांच्या हल्लयांमध्ये आत्तापर्यंत ७ जणांचा मृत्यू

चालू वर्षात (नोव्हेंबरपर्यंत) ७ नागरिकांचा मृत्यू,१५ जखमी, आणि १,२६२ जनावरांची हानी झाली आहे. यासाठी शासनाने १४९.९२ लाख रुपयांची नुकसानभरपाई वितरित केली. गेल्या वर्षाच्या तुलनेत आतापर्यंत आकडेवारी पाहता हल्लयांमध्ये प्रमाण ३० ते ३५ टक्क्यांनी घटले असले तरी, बिबट्यांचा धोका कायम आहे, असं वनविभागाचे म्हणणं आहे.

### भीतीचे सावट कायम

पारनेर, श्रीगोंदा, नगर, संगमनेर, कोपरगाव, राहुरी आणि नेवासा तालुक्यांमध्ये अजुनही बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर आहे. दिवसाढवळ्या शेतात जाणं शेतकऱ्यांना धोकादायक वाटतंय. रात्रीच्या वेळी बिबट्यांचे दर्शन आता नेहमी झाले आहे.

### वन विभागावर निष्क्रियतेचा आरोप

स्थानिक नागरिकांनी वन विभागावर गंभीर आरोप केले आहेत. पिंजरे उभारणे, गस्त वाढवणे, जनजागृती मोहीम हे सगळं केवळ कागदावरच आहे, अशी नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे. अनेक ठिकाणी बिबट्यांचे हल्ले वाढत असतानाही प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

### कायमस्वरूपी उपाय हवेत

ग्रामीण भागातील नागरिकांनी शासनाकडे महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. कायमस्वरूपी बिबट नियंत्रणासाठी ठोस योजना राबवावी, प्रत्येक गावात अधिक पिंजरे आणि रात्री प्रकाशयोजना करावी. बिबट्यांचे हल्ले काहीसे कमी झाले असले तरी धोका अजूनही तसाच कायम आहे. शासनाने आता केवळ आकडेवारी नव्हे, तर दीर्घकालीन उपाययोजना राबवून ग्रामीण भागातील जीव वाचवावेत, तसेच वेळोवेळी जनजागृती करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

### पारनेर, नगर आणि कोपरगाव पुन्हा हादरले

अलीकडच्या काळात पारनेर तालुक्यात बिबट्यांच्या हल्लयांनी भीतीचं वातावरण अधिकच गडद केलं आहे. महिन्याभरापूर्वी एका चिमुकलीवर हल्ला करून बिबट्याने तीला ठार मारले होते. तर कोपरगावमध्ये गेल्या आठवड्यात ४ वर्षांच्या आणखी एका चिमुकलीवर आणि एका महिलेवर हल्ला करून बिबट्याने दोघांचा बळी घेतला. आता नगर तालुक्यातील खारेकर्जुने येथे सहा महिन्याच्या मुलीचा बिबट्याने बळी घेतला आहे. या घटनांमुळे पारनेर, नगर आणि कोपरगाव परिसरात नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. स्थानिकांनी शासन आणि वन विभागाकडून तात्काळ ठोस कारवाईची मागणी केली आहे. कोपरगावात नरभक्षक बिबट्याला ठार मारण्याचे आदेश प्राप्त झाले. पण वन विभागाला बिबट्या शोधण्यात यश आले नाही.

